# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

"वन भवन" रामगीरी रोड, सिव्हील लाईन्स,नागपूर-४४० ००१
दूरध्वनी-०७१२-२५४९५६३, ई-मेल : pccfwl_ngp@sancharnet.in

विषय :- सर्प मित्राचे ओळख पत्राचा नमुना
क्रमांक :- कक्ष-२३(३)/प्रक्र.दाभोळकर/**२४१६**
नागपूर दि. **२४/११/२००८**

संदर्भ :- २५ सप्टेंबर २००८ रोजी नागपूर येथील कार्यशाळेत सर्पमित्रांचे ओळखपत्र व मार्गदर्शिकेबाबत चर्चा.

राज्यातील सर्व वनविभागांव्दारे जारी करण्यात येणारी सर्पमित्राची ओळखपत्रे व सर्पमित्रांकरीता मार्गदर्शक सूचना यामध्ये एकसूत्रता व समानता राहावी या उद्देशाने ओळखपत्र व त्यामध्ये नमूद करावयाच्या मार्गदर्शक सूचनांचा नमुना विहीत करण्यात येत असून त्यानुसार ओळखपत्रे जारी करण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे करीता

प्र.मु.व.सं. (वजी)
यांचे कडून अनुमोदीत

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद / नागपूर/ अमरावती/ धुळे /यवतमाळ

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मुंबई / नाशिक / नागपूर

वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर / उत्तर चंद्रपूर / दक्षिण चंद्रपूर

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट, अमरावती

प्रतिलिपी :-डॉ. नरेन्द्र दाभोळकर, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूनल समिती, व्दारा - परिवर्तन सहयोग हॉस्पिटल "ॲनेक्स", सदरबझार, सातारा -४१५००१

(मुख्य पृष्ठ)
महाराष्ट्र शासन

वनविभा गाचे नाव

# सर्प मित्राचे ओळखपत्र

(वन्यजीव (संर क्षण) अधिनियम १९७२ चे कलम ११(ब)
व ३९(३) अंतर्गत )

नोंदणी क्र ---- दिनांक-----

(आतील पृष्ठ क्र. १)
सर्पमित्राचे सविस्तर विवर ण

१. संपूर्ण नांव :

२. स्थानी क पत्ता :

३. कायमचा पत्ता :

४. जन्म तारी ख :

५. दुरध्वनी / मोबाईल क्र. :

६. रक्त गट :

७. सर्पमित्राचे स्वा क्षरीसहीत छायाचित्र

८. सील

(स्वाक्षरी)
उपवनसंर क्षक
यांची स्वा क्षरी

(आतील पृष्ठ क्र. २)
**सर्प मित्रां करीता मार्गदर्शक सुचना**

१ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ११(ब) अंतर्गत तरतुदी नुसार मानवी जीवीतास व मालमत्तेस धोकादायक ठरणा-या अनुसूची २ ते ४ मधील सर्पांना पकडणे व कलम ३९(३) नुसार ताब्यात घेवून वनक्षेत्रात मुक्त करणे करीता परवाना धारकास सदर ओळखपत्र देण्यात येत आहे.

२. सदर परवाना स्थानीक वन विभाग कार्यालया अंतर्गत कार्यक्षेत्रात जारी केल्याच्या तारखे पासून एक वर्ष पर्यंत लागु राहील.

३. सदर कामात जि वास धोका संभवत असल्याने सर्प मित्रांनी योग्य रकमेचा **व्यक्ती गत आयुर्विमा करण्याचे सूचविण्यात येत आहे.**

४.सर्पमित्रांस विषारी व विनविषारी सापांचे तसेच सापाच्या विवीध प्रजातीचे सखोल ज्ञान असावे तसेच त्यांना सापानी चावा घेतल्यास प्रथमोपचाराचे देखिल सखोल ज्ञान असणे अपेक्षित आहे.

५. कलम ११(ब) अंतर्गत परवान्यानुसार सर्पमित्राने पकडलेल्या सापांना जाहिर प्रदर्शनासाठी ठेवू नये. तसे केल्यास त्यास उक्त अधिनियमाचे कलम २(३९) चे व्याख्ये नुसार ते प्रदर्शन प्राणि संग्रहालय ठरेल व त्यास कलम ३८(H) नुसारकेन्द्रीय चिडियाघर प्राधिकरणाची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य ठरते. कायद्याचे उल्लंघन केल्याने कलम ५१ नुसर शिक्षेची कार्यवाही करण्यात येईल.

**(कृपया मागे पहा)**

(शेवटचे मलपृष्ठ)

६. कलम ११ (ब) व कलम ३९(२) व (३) चे अधिन पकडलेले, सापा बाबतची माहिती सर्पमित्राने संबंधित नजिकचे पोलीस स्थास किंवा उपवनसंरक्षक किंवा वनविभागाचे उपवनसंरक्षक / वनसंरक्षक यांना ४८ तासाचे आत देतील व त्यांचे निर्देशानुसार सापास त्याचे योग्य अधिवासात त्वरीत मुक्त करतील.

७. कलम ३९(३) चे अधिन वरील प्रमाणे वनअधिका-यांकडून प्रकरण परत्वे प्राप्त निर्देशाचे अधिन राहून सर्प मित्रांना तात्पुरत्या स्वरुपात निर्देशित ठिकाणी व कालावधीसाठी सर्प ताब्यात ठेवता येईल.

८. पकडलेल्या सापापासून विष किंवा त्यांचे इतर अवयव काढता येणार नाही.

९. सर्प मित्रांनी साप पकडण्या पासून मुक्त करण्या पर्यंत शास्त्रोक्त पध्दतीचा उपयोग करावा.

१०. सर्प मित्रांनी पकडलेल्या सापाची संपूर्ण माहिति विहित प्रपत्रात नोंदवहीत नोंदवावी. त्याच प्रमाणे योग्य अधिवासात सर्प सोडतांना त्या ठिकाणाची माहिती देखील रजीस्टर मध्ये नोंद ठेवावी.

११. सर्पमित्राने पकडलेल्या सापाचा मासीक लेखा वनविगाचे विभागीय कार्यालयास सादर करावा.

१२. माहिती प्रपत्राचा नमुना खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पकडल्याचे ठिकाण | वेळ व दि. | सर्पाची प्रजाती | मुक्त केल्याचे ठिकान | वेळ व दि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |